# पुणे महानगरपालिका निवडणूक अहवाल २०१२

**७ मार्च २०१२**

प्रज्ञा शिदोरे आणि तन्मय कानिटकर

GreenEarth

GreenEarth Social Development Consulting Pvt. Ltd.
contactus.greenearth@gmail.com

(शासनव्यवस्थेच्या नीलप्रतीसाठी)

# पुणे महानगरपालिका

## निवडणूक अहवाल

## २०१२

भाग-१

# अनुक्रमणिका


अनुक्रमणिका ....................................................................................................4

प्रस्तावना ........................................................................................................5

निवडणूक आयोग आणि प्रक्रिया ..............................................................................6

आचारसंहिता भंग .............................................................................................8

जाहीरनाम्यांमधला काही वेगळेपणा.........................................................................10

आपले मत:....................................................................................................10

पुणे जनहित आघाडी.........................................................................................11

महाराष्ट्र नवनिर्माण सेना....................................................................................12

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस.......................................................................................12

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष .........................................................................................12

महायुती........................................................................................................12

पुणे नागरीक संघटना ........................................................................................13

निवडणुकीचे मुद्दे ..............................................................................................14

संस्था, संघटना आणि गट यांचा सहभाग ...................................................................16

निवडणूकीचा प्रचार............................................................................................18

संदर्भ.............................................................................................................22

Annexure.......................................................................................................23

आय.बी.एन लोकमत सर्वेक्षण- पुणे...........................................................................23

PMC ELECTIONS 16th FEB 2012: CITIZEN’S CHARTER of DEMANDS – CITY WIDE & WARD LEVEL from National Society for Clean Cities.........................................................................25

## प्रस्तावना

३ जानेवारीला आचार संहिता लागू झाल्या पासून पुण्याबरोबरच अन्य ९ ठिकाणी महानगरपालिका निवडणुकांचं राजकारण सुरु झालं. १७ फेब्रुवारीला निकाल लागल्यावर या राजकारणाचा एक भाग संपला, आणि त्या नंतर सुरु झाला सत्ताकारणासाठीचा छुपा संघर्ष. या सत्ताकारणाच्या संघर्षात काय काय घडले, कोणी काय घडविले आणि बिघडविले याचा शोध या विश्लेषणातून घेण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे.

या विश्लेषणामधे सत्ताकारणाच्या विविध घटकांनी या ३ जानेवारी २०१२ ते १७ फेब्रुवारी २०१२ या मर्यादीत कालावधीमधे कशी कामगिरी बजावली याबद्दलचे टिपण आपल्याला वाचायला मिळेल. तसेच निवडणुकीच्या प्रक्रियेचे विश्लेषणही वाचायला मिळेल.

या अहवालामधे खालील राजकीय पक्ष आणि संघटनांचा विचार केला आहे.

- महाराष्ट्र नवनिर्माण सेना
- पुणे नागरिक संघटना
- पुणे जनहित आघाडी
- राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष
- नॅशनल कॉंग्रेस पक्ष
- महायुती (शिवसेना-भारतीय जनता पक्ष- रिपाइं (आठवले गट))

तसेच परिवर्तन आणि नॅशनल सोसायटी फॉर क्लीन सिटीज् सारख्या नागरी संघटनांचा आणि त्यांच्या कामांचाही आढावा घेतला गेला आहे.
यामधे निवडणुकीच्या निकालांचे विश्लेषण नाही. ते आपल्याला या अहवालाच्या पुढच्या टप्प्यात वाचायला मिळेल.

- प्रत्येक उमेदवारास किती मते मिळाली आहेत याचा एक तक्ता
- जाहीरनाम्यांच्या तुलनात्मक अभ्यासासाठी केलेला तक्ता

हे अहवालासोबत जोडत आहोत.

# निवडणूक आयोग आणि प्रक्रिया

दिनांक ३ जानेवारी २०१२ रोजी महाराष्ट्रातील १० महानगरपालिकांच्या निवडणूका जाहीर झाल्या. निवडणुका जाहीर होण्यापासून ते निकाल जाहीर करण्यापर्यंत हा या निवडणुकीचा कार्यक्रम

| **दिनांक** | **टप्पा** |
|---|---|
| ३ जानेवारी २०१२ | १० महापालिका आणि २९ जिल्हापरिषदांमधील निवडणुका जाहीर व आचारसंहिता लागू |
| ५ जानेवारी २०१२ | मतदार याद्या निश्चित करण्याची तारिख |
| २४ ते ३१ जानेवारी २०१२ | नामनिर्देशपत्र स्वीकारण्याचा कालावधी |
| १ फेब्रुवारी २०१२ | नामनिर्देशपत्राची छाननी |
| १ फेब्रुवारी २०१२ | वैध उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे |
| ३ फेब्रुवारी २०१२ | नामनिर्देशपत्र मागे घेण्याचा अंतिम दिनांक |
| ४ फेब्रुवारी २०१२ | उमेदवारांची अंतिम यादी तयार करणे |
| ४ फेब्रुवारी २०१२ | निवडणूक चिन्ह देणे |
| ४ फेब्रुवारी २०१२ | मतदान केंद्रनिहाय मतदारांची यादी प्रसिद्ध करणे |
| १४ फेब्रुवारी २०१२ | संध्याकाळ ५:३० वाजल्यापासून प्रचार बंदी |
| १६ फेब्रुवारी २०१२ | मतदानाचा दिनांक |
| १७ फेब्रुवारी २०१२ | निकालाचा दिनांक |

### वेळापत्रक

एकूणच वेळापत्रक पहिले तर लक्षात येते की ,४ फेब्रुवारीला सर्व उमेदवारांची अंतिम यादी निश्चित झाली आणि प्रचाराला जेमतेम दहा दिवस मिळाले .कारण १४ फेब्रुवारीला प्रचार संपला .प्रभाग पद्धत असल्याने एका प्रभागात ३० ते ४० हजार एवढी मतदार संख्या होती .एवढ्या मतदारांशी संपर्क साधण्यासाठी दहा दिवस हा कालावधी खूपच कमी होता .जवळ जवळ रोज ३-४ हजार मतदारांशी संपर्क साधणे कठीण होते . याचा फटका अनेक उमेदवारांना बसला .यापुढे निवडणूक आयोगाने प्रचाराला अधिक वेळ मिळेल याची दक्षता घेतली पाहिजे .

शिवाय प्रत्यक्ष पक्षाकडून तिकीट मिळण्याआधीच अनेकांनी प्रचाराला कमी वेळ मिळणार हे लक्षात घेऊन प्रचाराला सुरुवात केली होती .पण निवडणूक आयोगाकडून उमेदवाराने केलेला खर्च हा उमेदवारी नक्की

झाल्यावर मोजला जातो .त्यामुळे अनेकांनी उमेदवारी नक्की होण्याआधी केलेला खर्च निवडणूक आयोगाकडे सादर करण्याची आवश्यकताच उरली नाही .साहजिकच खर्चाचे निवडणूक आयोगाने घालून दिलेले बंधन पाळले गेले नाही .

## प्रभाग पद्धत

पुणे महानगरपालिकेची यावेळची निवडणूक“ प्रभाग पद्धतीने ”घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला .तो घेत असताना निवडणूक आयोगाची भूमिका काय होती ,प्रभाग पद्धतीने निवडणूक घेण्यामागची नेमकी कारणे काय आहेत याबद्दल कुठलाच खुलासा करण्यात आला नाही .त्यामुळे लोक अंधारात होते .यापूर्वी २००२ मध्ये पुण्यात प्रभाग पद्धत होती ,पण ती बदलून २००७ मध्ये वॉर्ड पद्धतीने निवडणूक घेण्यात आली .असे असताना पुन्हा प्रभाग पद्धत का अवलंबण्यात आली याचे पुरेसे स्पष्टीकरण कुठेही सापडले नाही .

प्रभाग पद्धतीमुळे या निवडणुकीत विजयी अपक्षांची संख्या १४ वरून १ वर आली .यावेळची एक अपक्ष नगरसेविका सुद्धा बंडखोर आहे .प्रभाग पद्धतीमुळे मतदार संख्या ३० ते ४० हजार झाल्याने अनेक अपक्षांना कठीण गेले .तसेच कॉंग्रेस आणि शिवसेनेला या पद्धतीचा फटका बसल्याचे निदर्शनास आले .तब्बल ४२ जागांवर दोन्ही जागा एकाच पक्षाच्या निवडून आल्या .ज्याचा फायदा मनसे आणि राष्ट्रवादीला झाला .

## मतदान केंद्रे

यावेळी प्रथमच निवडणूक आयोगाने शाळांबरोबरच हौसिंग सोसायट्यांमध्येही मतदान केंद्रे उभारली होती . प्रत्येक निवडणुकीत जवळच्या शाळेत मतदान केंद्र असते .पण यावेळी शाळांबरोबरच पुण्यात एकूण २३८ हौसिंग सोसायट्यांमध्ये मतदान केंद्रे उभारली होती .काही ठिकाणी उमेदवारच ज्या सोसायटीत राहतो अशा ठिकाणीही मतदान केंद्र उभारण्यात आल्याने इतर उमेदवारांनी याबद्दल आक्षेपही घेतला .पण एकुणात या मतदान केंद्रांमुळे मतदारांची सोय झाल्याचे अनेकांनी नोंदवले .

## मतदान प्रक्रीया

यापूर्वी प्रभाग पद्धत असताना मतदान यंत्रे नव्हती .तर मतदान पत्रिका होती ज्यावर शिक्का मारायचा असे . पण मतदान यंत्रे प्रभाग पद्धतीत कशी असणार ,दोन मते कशी देता येणार ,एकाच मशीन वर दोन्ही जागांसाठी मतदान करायचे की दोन स्वतंत्र मशीनवर करायचे ,एकच मत द्यायचे असल्यास काय करायचे , दोन्ही मते एकाच पक्षाला द्यावी लागतात का असे प्रश्न मतदारांच्या मनात निर्माण झाले होते .अनेक ठिकाणी ,दोन्ही मते एकाच पक्षाला द्यावी लागतील असा प्रचार काही उमेदवारांकडून करण्यात आल्याचेही निदर्शनास आले .यावर खूप आधीपासून निवडणूक आयोगाने पद्धतशीरपणे मतदारांचे प्रबोधन करण्याचे उपक्रम घेण्याची आवश्यकता होती .अनेक सामाजिक संस्था सुद्धा नेमकी मतदान प्रक्रिया कशी असणार आहे

याबाबत अनभिज्ञ असल्याने काही ठिकाणी गैरसमज पसरण्यात हातभारच लागला .शेवटच्या २ दिवसातच वर्तमानपत्रातून मतदान प्रक्रियेबद्दल माहिती छापून आली .

## आचारसंहिता भंग

साधारणपणे ९ फेब्रुवारी वारीपर्यंत पुण्यात ८१ आचारसंहिताभंगाचे गुन्हे दाखल झाले होते .याची सुरुवात ज्या दिवशी आचारसंहिता लागू झाली त्या दिवशी अजित पवार यांच्या हस्ते उद्घाटनाचा कार्यक्रम झाला इथपासून झाली .निवडणूक आयोगाने अजित पवार यांचा खुलासा ऐकल्यावर त्यांना' क्लीन चीट 'दिली . त्यानंतर सर्वच पक्षांनी निवडणूक आयोगाचे काही नियम धाब्यावर बसल्याचे निदर्शनास आले .पूर्व परवानगी शिवाय रोड शो चे आयोजन ,रोड शो मध्ये तीन पेक्षा जास्त गाड्यांचा वापर अशा नियमांचे सर्रास उल्लंघन अजित पवार व राज ठाकरे यांच्या प्रचारादरम्यान झाले .आचारसंहिता संदर्भातील काही नियमांबाबत राजकीय पक्षांनी नाराजीही व्यक्त केली .तर काहींनी निवडणूक आयोगाचा धाक असलाच पाहिजे असेही मत व्यक्त केले .नागरिक संघटनेच्या विवेक वेलणकर यांनी गेल्या निवडणुकीत आचारसंहिता भंगाच्या दाखल केलेल्या गुन्ह्यांचं काय झालं असा प्रश्नही उपस्थित केला होता .एकूणच आचारसंहिता भंगाच्या गुन्ह्यांचे पुढे काय झाले/होते हे पाहणे आवश्यक आहे.

निवडणुकीदरम्यान ९ फेब्रुवारीच्या बातमीनुसार ८१ अचारसंहिता भंगाचे गुन्हे ,११ मारामारीचे गुन्हे दाखल झाले होते .तर दोन राजकीय पक्षांमधील वादावादीच्या ४४ तक्रारी पोलिसांकडे करण्यात आल्या होत्या . प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशीही बोगस मतदान ,पैसे वाटप यावरून वादविवाद व मारामारीच्या घटना घडल्या.

काही ठिकाणी आचारसंहितेचे सर्रास उल्लंघन केल्याचे ऐकिवात आले तरीही त्यावर कोणतीही कारवाई झाली नाही .निवडणुकीपूर्वी एखाद्या संघटनेला ६०,००० पासून एक लाख रुपयांपर्यंत देणगी देणे ,निवडणुकीच्या आदल्या रात्री सोन्याची वळी वाटणे अशा गोष्टी निवडणूक आयोग व पोलिसांच्या कचाट्यातून सुटल्या आहेत .एका मताची किंमत ५०० रुपयांपासून ७००० रुपयांपर्यंत गेली होती अशी चर्चाही होती .तसेच यासगळ्याबाबत पोलिसांनी आणि प्रशासनाने बघ्याची भूमिका घेतल्याचा आरोपही अनेकांनी केला .

## मतदार यादीतील चुका

मतदार यादीमध्ये असंख्य चुका होत्या .हयात नसलेल्यांची ,आता त्या भागात न राहणाऱ्यांची नावेही यादीमध्ये होती .अनेकांची नावे एकाच यादीत दोनदोनदा होती ,तर काहींची नावे तर तीनदा होती !यामुळे मतदानाची अंतिम टक्केवारी चुकीची आणि फसवी असण्याची शक्यता अनेकांनी व्यक्त केली आहे . पुण्यातील मतदान ५१ %झाले असले तरी प्रत्यक्षात मतदार यादीत त्रुटी नसत्या तर हाच आकडा ६० % दिसला असता असेही तज्ञांचे मत आहे .

मतदार यादीतल्या त्रुटींमुळे अनेकांना मतदानापासून वंचित राहावे लागले .अनेकांनी नोंदणी करूनही नाव यादीत आले नाही .प्रशासनाकडून पत्ते चुकीचे लिहिले गेले ,त्यामुळे शेजारच्या प्रभागातल्या यादीत अनेकांचे नाव गेले .याही गोष्टीमुळे अनेकांना मतदान करता आले नाही .नावाच्या स्पेलिंग मधल्या चुकांमुळे निवडणूक आयोगाने तयार केलेल्या इंटरनेट वरील“ सर्च इंजिन ”मध्ये अनेकांना नाव सापडले नाही .याचा थेट परिणाम मतदान घटण्यामध्ये झाला असणार .मतदार यादीमध्ये अमुलाग्र सुधारणा करण्याची गरज आहे .यादीतील नावे काहीही कारण नसताना गायब होणे हाही एक मोठा प्रश्न .मतदार याद्या अद्ययावत आणि नीट असतील तर मतदानाचा टक्का नक्की वाढेल इतकेच नव्हे तर उमेदवारांनाही प्रचार करणे अधिक सोयीचे होईल .मतदार नोंदणी आणि मतदार याद्या दुरुस्तीची प्रक्रिया कायम सुरु असायला हवी .या निवडणुकीच्या वेळी मतदार यादी बद्दल तक्रार करण्यासाठी व आक्षेप घेण्यासाठी अवघे २-३ दिवस देण्यात आले होते .शिवाय मतदार यादीतील नावात काही दोष असल्यास आक्षेप घेऊनही अनेक ठिकाणी त्यात सुधारणा केली गेली नाही कारण ते अधिकार महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडे नव्हते .एकूणच मतदार याद्यांमधले घोळ कायम राहिले .निवडणुका आल्या की ज्या पद्धतीने घाईघाईत हे सगळे उरकण्यात येते याचा परिणाम म्हणजे सदोष मतदार याद्या .

# जाहीरनाम्यांमधला काही वेगळेपणा

### आपले मत:

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आपल्या जाहिरनाम्यात महापालिकेचा कारभार अधिक पारदर्शी व्हावा यासाठी मुद्दे नमूद केले आहेत. त्याच बरोबर पुणे नगरिक संघटनेने मांडले आहेत. महायुतीने केवळ टेंडरिंगची पद्धत पारदर्शी करू असे मांडले आहे. माहिती अधिकाराने कारभार पारदर्शी व्हायला मदत होतेच परंतु स्व:हून पुढाकार घेऊन आपला कारभार पारदर्शी करण्याबद्दल पाउले उचलणे ही एक चांगली सुरवात आहे.

<u>लोकसहभाग:</u> ठराविक कालावधीने वॉर्ड सभा घेऊन राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि पुणे नागरिक संघटनेने लोकसहभागाच्या एका पद्धतीवर भाष्यकेले आहे. याच प्रमाणे जनहित आघाडीने क्षेत्र सभा कायद्याचा आग्रह धरला आहे. परंतु लोकसहभागाच्या आणखी काही पद्धती, जसे लोकांचा अर्थसंकल्प आदी विचार होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनेही विकास कामांच्या नियोजनात नागरिकांना सहभागी करून घेतले जाईल असे आपल्या जाहीरनाम्यात म्हणले आहे.

नागरिक संघटना, जनहित आघाडी आणि महायुती या तीनही पक्षांनी जकात पुर्णपणे रद्द करण्याची आग्रही भुमिका मांडलेली आहे. जनहित आघाडी आणि नागरी संघटना यांनी पर्यायी उत्पन्नाचे साधनही सुचविले आहे. राष्ट्रवादी कॉंगेस या एकमेव पक्षाने पर्यटनावर भर देऊन त्यातून पालिकेला महसूल निर्माण करण्याचा विचार केला आहे. जनहित आघाडीने पुणेकरांचा करातला हक्काचा हिस्सा मागून घेण्यावरही भर दिला आहे तसेच शहरासाठी बॉंड, त्याचबरोबर नागरिक संघटनेची १% सरसकट वॅट च्या कल्पनेवर विचार होणे आवश्यक आहे. सर्व पक्ष आपल्या पक्षिय भूमिका मांडतात पण नागरिक संघटना या एकमेव पक्षाने आपले नगरसेवक व पालिकेचे अधिकारी यांच्या कार्यपद्धतीवर भाष्य केले आहे.

पुणे जनहित आघाडीने स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक बळ देणारे कायदे व त्यांची अंमलबजावणी यावर भर दिला आहे. जुन्या वाड्यांसंबंधी कॉंगेस पक्ष, राष्ट्रवादी आणि महायुती आपली भुमिका मांडतात. हा मुद्दा जरी पुण्याच्या एका छोट्या भागासाठी मर्यादित असला तरी नागरी व्यवस्थेसाठी महत्वाचा आहे.

झोपडपट्टी पुनर्वसनाबद्दल प्रत्येकच पक्षाने आग्रही भुमिका मांडली आहे. परंतु फक्त मनसेनेच यापुढे अनधिकृत बांधकामे आणि झोपड्या होऊ देणार नाही अशी ठोस भुमिका  मांडली आहे.

पुणे नागरिक संघटनेचा तज्ञांच्या सहभागावर भर दिला आहे.

## टिका

कॉंग्रेस, महायुती आणि मनसेने आपला जाहिरनामा अक्षरश: मतदानाच्या २ दिवस अधी सादर केला. त्यामूळे जाहिरनामा हा केवळ उपचार म्हणूनच प्रकाशित केला होता का, असा प्रश्न पडतो. यामुळेच उमेदवारालाही आपला व्यक्तीगत जाहिरनामा कसा प्रकाशित करावा, तो पक्षाच्या जाहिरनाम्याशी संलग्न असेल का असा प्रश्न पडला. मनसेचा जाहिरनामा प्रसिद्ध करण्याची पद्धत जरी वेगळी आणि अधिक लोकांपर्यंत पोहचेल अशी होती तरी तो आदल्या दिवशी आल्याने त्याबद्दल चर्चा होऊ शकली नाही.

या जाहीरनाम्यांमधे मूलभूत धोरणात्मक बदल करण्याचा दृष्टीने खूपच कमी मुद्दे नोंदलेले आहेत. बाकीचे मुद्दे एखाद्या प्रकल्प अथवा योजनेपुरते मर्यादित आहेत. लक्षणांनाच मुख्य रोग समजून त्यावर उपाययोजना आखल्या आहेत. याने मुख्य रोगावर इलाज न होता त्याच्या लक्षणांवरच इलाज होतो. ठोस मुद्द्यांचा आभाव आहे.

कॉंग्रेसच्या जाहिरनाम्यात कोणतीही ठोस भुमिका नाही. जाहीरनाम्यातील २५ पैकी ४ मुद्दे हे नविन बांधकाम व त्यासंबंधी आहेत त्याचा शहराच्या भल्यासाठी काही ठोस उपयोग नाही.

## पुणे जनहित आघाडी

१. क्षेत्र सभा कायदयाचा आग्रह धरणार
२. माहिती प्रकटीकरण कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी
३. ७४ व्या घटना दुरुस्तीअंतर्गत स्वतंत्र वित्त आयोगाची स्थापना
४. सरकारला पुणेकर देत असलेल्या करातून पुण्याच्या विकासातून हकाचा हिस्सा मागण्यासाठी सुप्रीम कोर्टात जाणार
५. नोकरशाहीला ज्यादा अधिकार देणाऱ्या बिपीएमसी Act मधील बदलांविरोधात हायकोर्टात याचीका
६. दफ्तरदिरंगाई कायद्याची काटेकोर अंमलबजावणी
७. कामात सुसूत्रता आणण्यासाठी भूसंपादन आणि भूप्रापण ही दोन्ही खाती एकाच अधिकाऱ्याखाली घेणे.
८. मनपाच्या जागांचे मुल्यमापन करण्यासाठी क्रीसील रेटींग करून घेऊ.
९. नागरी हिताच्या जागा त्वरित संपादित करण्यासाठी कार्यपद्धती
१०. महिला केंद्री अर्थसंकल्प
११. बचत गटांना बाजारपेठ
१२. विना रजिस्ट्रेशन इंजिनीयर्सनाही महापलिकेची कामे देणार
१३. संपूर्ण जकात रद्द
१४. शहराच्या विकासासाठी बॉंड काढू.
१५. मनपाचे संपूर्ण संगणकीकरण- ई-गवर्नन्सच्या कामासाठी संगणक अभियंत्यांनाच काम

१६. पेट्रोल-डीजेल वरील जकात रद्द

## महाराष्ट्र नवनिर्माण सेना

१. चुकीच्या आणि अनधिकृत गोष्टी महापालिकेपर्यंत पोचवू शकाल असा सूसज्ज आणि प्रभावी कक्ष निर्माण करू
२. दर महिन्याला कोणत्या गोष्टी कुठे आणि कशासाठी मंजूर झाल्या याची माहिती तुमच्या पर्यंत पोहचवू
३. दर ६ महिन्याच्या खर्चाचा तपशील तुमच्या समोर ठेऊ.

## भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस

१. पुढच्या पाच वर्षात कोणतीही नवीन करवाढ नाही
२. बचतगटाच्या भांडवली उद्योगांना अनुदान
३. शनिवारवाडा परिसराभोवती नवीन बांधकाम करण्यावर असलेली बंदी उठवणार
४. ५ वी ते १० वी च्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत ई-लर्निंग व मोफत ५ वी ते १० वी च्या सर्व विध्यार्थ्यांना टॅब.
५. फक्त राष्ट्रीय महापुरुषांची नावे देणार

## राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष

१. पुणे दर्शनचे नवे मार्ग तयार करणार व सेवा सुधारणार.
२. पर्यटनासाठी थीम टुर्स निर्माण करणार
३. पीएमआरडीए ची निर्माती करणार
४. दर ६ महीन्याला वॉर्ड सभा
५. १ ली ते ७ वी च्या मनपाच्या विद्यार्थ्यांसाठी इ-लर्निंग
६. स्पर्धापरिक्षा देणाऱ्यांसाठी अनुदान- शिष्यवृत्ती आणि ग्रंथालये उभारणार
७. असंघटीत क्षेत्रातील कामगारांना १ लाख रुपयांचा विमा
८. पहाटेपासून मध्यरात्रीपर्यंत बागा उघड्या ठेवण्यात येतील
९. सुवर्ण जयंती सहकार योजनेची अंमलबजावणी
१०. जुन्या वाड्यांच्या पुनर्बांधणीसाठी अधिक एफएसआय.

## महायुती

१. मुंबईतील अन्नदाता योजनेच्या धरतीवर पुण्यात योजना
२. जकात रद्द करणार व पर्यायी उत्पनाचे मार्ग शोधणार
३. प्रशासनावर होणाऱ्या खर्चावर नियंत्रण
४. पारदर्शी व खुली ई टेंडरींग

५. सर्व कारभार इ-गवर्नंसने
६. आर्थिक दुर्बल घटकांसाठी विशेष आरोग्य विमा
७. स्त्रिभृणहत्या रोखण्यासाठी योजना
८. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना
९. जुन्या वाड्यांची पुनर्बांधणी योजना

## पुणे नागरीक संघटना

१. दर ३ महिन्यांनी वॉर्ड सभा
२. मनपाचा अधिकारी भ्रष्टाचारात दोषी आढळल्यास त्याला पाठीशी घालणार नाही.
३. मनपाच्या सर्व वर्क ऑर्डर्स ह्या पालिकेच्या संकेतस्थळावर व स्थायी व सर्वसाधारण सभा कार्यपत्रिका संकेतस्थळावर.
४. प्रत्येक प्रभागात मोहल्ला समितीत नगरसेवकाचा सहभाग.
५. महापालिकेच्या समित्यांमधे तज्ञांचा सहभाग
६. रेशनींग, रॉकेल संदर्भात वस्तीवासीयांमधे जागरूकता
७. शिक्षण मंडळावर शिक्षण तज्ञाची नेमणूक
८. शिक्षण मंडळाचा कारभार जाहीर करू
९. मनपा अधिकाऱ्याची व कर्मचाऱ्यांची मालमत्ता जाहीर करणार
१०. सर्व उमेदवारांचा राजीनामा निवडणुकी आधीच पुणे नागरीक संघटनेकडे - भ्रष्टाचार अथवा पक्ष बदलल्यास तो आयुक्तांकडे पाठवून देणार.
११. नगरसेवकाची किमान उपस्थिती ९०% राहील
१२. माजी सैनिकांना शिक्षण मंडळामधे ५% जागा मिळविण्यासाठी प्रयत्न करू
१३. माजी सैनिकांना मिळकत करातून सूट मिळवून देण्य़ासाठी पाठपुरावा करण्य़त येईल.
१४. कोणत्याही प्रकारचा कर वाढवू दिला जाणार नाही.
१५. कराची थकबाकी वसूल करण्यासाठी सक्षम योजना
१६. मनपाच्या जागांचे भाडेकरार यांचे बाजारभावाने नुतनीकरण
१७. जकात रद्द करण्य़ात यावी व वॅट प्रमाणे वार्षिक उलाढालीवर सरसकट १% कर आकारणार

# निवडणुकीचे मुद्दे

पुणे महानगरपालिका निवडनुकीमधे असे अनेक मुद्दे होते जे प्रत्यक्ष जाहीरनाम्यामधे आले नाहीत, पण सभा, भाषणे आणि मुलाखतींमधे बोलले गेले.

### सुरेश कलमाडी

सुरेश कलमाडीच्या आगमनाचा मुद्दा सर्वच विरोधी पक्षांनी मांडला, त्यावर भरपूरर उलटसूलट चर्चा झाल्या. कॉंग्रेसला याचा फायदा होईल की तोटा, कलमाडी नक्की कशी भूमिका बजावेल इत्यादी विषयांवर बोलले गेले. त्याचबरोबर कलमाडीचे पुण्यात फटाके वाजवून स्वागत झाले हाही एक टीकेचा मुद्दा बनला होता. पण कलमाडींनीही काही दृष्य स्वरुपात काम न केल्याने हा मुद्दा फारसा वाढत गेला नाही.

### बायो-डायव्हरसिटी पार्क

**भाजप**: पर्यावरणवाद्यांचा छुपा रस असल्याचे म्हणत आणि झोपडपट्टी होऊ नये यासाठी टेकड्यांवर ४% बांधकामाला परवानगी द्यावी अशी भूमिका भाजप ने मांडली.

**राष्ट्रवादी**: दोन वेगळ्या भूमिका. काही ठिकाणी शहराध्यक्षा वंदना चव्हाण यांनी टेकडीवर एक टक्काही बांधकाम नको ही राष्ट्रवादीची अधिकृत भूमिका असल्याचे सांगितले तर इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते हे बीडीपी बाबत राष्ट्रवादीची भूमिका अद्याप निश्चित झाली नाही असे सांगत होते.

**मनसे**: पक्षाची भूमिका टेकड्यांवर बांधकाम नको अशीच होती. मात्र पक्षाची भूमिका उमेदवारांना माहित होतीच असे नव्हते. त्यामुळे उमेदवार बोलतोय एक आणि पक्षाची भूमिका दुसरीच असे चित्र बघायला मिळाले.

**शिवसेना**: पहिल्यापासून शिवसेनेने टेकड्यांवर शून्य टक्के बांधकाम हीच भूमिका कायम ठेवली आहे.

**कॉंग्रेस**: भूमिकाच मांडली नाही. या प्रश्नाबाबत योग्य तो तोडगा काढणे सुरु आहे असे कॉंग्रेसचे पदाधिकारी वेगवेगळ्या सभा-चर्चांमध्ये म्हणाले.

### दादोजी कोंडदेव

दीड वर्षापूर्वी पुण्याचा लाल महालातून दादोजी कोंडदेव यांचा पुतळा रातोरात हलविण्यात आला. यावर शिवनेनेनी बराच हल्लाबोल केला होता. पण निवडणुकीच्या प्रचारात हा विषय फारसा बोलला गेला नाही. उद्धव ठाकरे यांनी या मुद्द्याचा उल्लेख १४ फेब्रुवारीच्या सभेमधे औरंगाबाद शहराचे नामकरण संभाजीनगर करण्याच्या मुद्द्यावरून केला. कोंडदेवांचा पुतळा हलवायला सत्ताधाऱ्यांना वेळ आहे पण स्वराज्यावर हल्ला करणाऱ्या औरंगजेबाचं नाव असणाऱ्या औरंगाबादचं नाव संभाजीनगर करायला वेळ नाही असंही ते म्हणाले.

मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ददोजी कोंडदेवांचा पुतळा असा रातोरात पोलिसांच्या देखरेखीखाली हलवता येतो तर मग अनधिकृत बांधकामे हटविण्यासाठी पोलिसयंत्रणा का मिळत नाही? असा सवाल त्यांनी केला. आपले शिक्षण कोणत्या जातीचे आहेत असे विचारून आपण शाळेत जातो का? शिक्षण आणि इतिहास या दिन्ही गोष्टींमधे जातीपातीचं राजकारण आणू नका असेही ते म्हणाले.

### सार्वजनिक वाहतुक

सभांमध्ये आणि जाहीर कार्यक्रमात भाजपच्या विद्यमान नगरसेविका मनिषा घाटे, तसेच शहराध्यक्ष विकास मठकरी यांनी पुण्यात रींग रोड असावा अशी भूमिका मांडली.

पुण्याच्या सार्वजनिक वाहतुकीचं मातेरं हे कायनेटीक आणि बजाज यांनीच केलं आहे असं राज ठाकरे म्हणाले. त्याच बरोबर आपले राज्यकर्ते हे स्वार्थासाठी आणि आपले राजकीय हितसंबंध जपण्यासाठी सार्वजनिक वाहतुकीला बढावा देत नसल्याची टिकाही त्यांनी केली.

### अर्थार्जनाच्या नाड्या आमच्या हातात

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं महानगरपालिकां आणि राज्य सरकारच्या आर्थिक संबंधांबद्दलचं वक्तव्य महत्वाचं वाटतं. ते म्हणाले की, जी शहरे राष्ट्रवादी पक्षाला मदत करतील त्यांना राज्य सरकार मदत करेल. या विधानावर कोणत्या रजकीय पक्षांनी पद्धतशीरपणे आक्षेप घेतल्याचे दिसले नाही. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी “...पण अर्थसंकल्पावर सह्या मी करतो” अशी प्रतिक्रीया दिली. तर, राज ठाकरेंनी “राज्यसरकारने प्रत्येक शहराचा विकास केलाच पाहिजे, विकास करण्यासाठी यांना नगरपालिका का हव्यात, यांच्याकडे राज्य सरकार आहे ना!” असा मुद्दा मांडला.

**विकास आराखडा**: भाजप प्रदिप रावत यांनी विकास आराखडा वेळेत मंजूर न होण्यावर टीका केली. अपघातांचे वाढलेले प्रमाण याबाबत गिरीश बापट यांनी सरकारला जबाबदार धरले. मुनगंटीवार यांचे भाषण मुद्द्यांपेक्षा भावनांना हात घालणारे होते, राजकीय इच्छाशक्ती हवी इत्यादी.

### कचरा

सर्वांनी पुण्याच्या कचरा प्रश्नाबद्दल मत मांडले असले तरी त्याबाबत कुठलेही ठोस वक्तव्य कोणीच केले नाही. किंबहुना प्रभागातच कचरा जिरवू, कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे प्रकल्प उभारू हेच बहुतेकांनी सांगितले. मात्र हे सगळे कसे करणार याविषयी कोणीच काही विशेष बोलले नाही. महापौर मोहनसिंग राजपाल यांनी एकाच कचरा डेपो वर ताण येतो म्हणून शहराच्या चार दिशांना चार कचरा डेपो असावेत अशी भूमिका ‘सकाळ’ आयोजित कार्यक्रमात मांडली. तर राष्ट्रवादी -कॉंग्रेसने प्रत्येक नागरिकाने आपला ओला सुका कचरा वेगळा करावा असे सुप्रीम कोर्टाने सांगितल्याचा आधार घेत सगळी जबाबदारी नागरिकांवर टाकली.

# संस्था, संघटना आणि गट यांचा सहभाग

राजकीय पक्ष, निवडणूक आयोग आणि एकूणच शासकीय यंत्रणा याबरोबरच असंख्य सामाजिक संस्था आणि संघटनांचा सहभाग या निवडणुकीमध्ये दिसून आला. विविध माध्यमातून, आपापल्या पद्धतीने या संस्थांनी निवडणुकीत मतदार नोंदणीपासून ते मतदारांच्या जागृतीपर्यंत अनेक बाबतीत योगदान दिले.

## वेबसाईटस

अनेक गट, युवक एकत्र त्यांनी मतदारांना जागरूक करण्यासाठी संकेतस्थळे सुरु केली. punepolitics.com, punevotes.com, punepolls.com या संकेतस्थळावर उभ्या राहणाऱ्या सर्व उमेदवारांची माहिती प्रसिद्ध केली. ज्यामध्ये उमेदवाराचे नाव, पक्षाचे नाव, चिन्ह आदी बाबींचा समावेश होता. सुरुवातीला अतिशय उत्साहात सुरु झालेली काही संकेतस्थळे मात्र नंतर माहिती अद्ययावत करण्यामध्ये कमी पडली. तरी punepolitics.com या संकेतस्थळाचे प्रयत्न उल्लेखनीय आहेत. निवडणुकीचा निकाल लागल्यावर सर्वच्या सर्व विजयी उमेदवारांची यादी या संकेतस्थळावर बघण्यास उपलब्ध आहे. परिवर्तन नावाच्या संस्थेने निवडणुकीपूर्वी पुण्यातील सर्वांच्या सर्व १४४ नगरसेवकांचे प्रगतीपुस्तक तयार करून आपल्या संकेतस्थळावर पाहण्यासाठी खुले केले होते.

## खुल्या चर्चा

काही ठिकाणी स्वयंसेवी संस्थांनी प्रभागातील सर्व उमेदवारांना बोलावून त्यांच्याशी चर्चा केली. त्यांना प्रश्न विचारले, त्यांचे विचार ऐकून घेतले. बहुतेक ठिकाणी या चर्चांना लोकांची उपस्थिती कमी होती. यामध्ये 3S-भारत, नैशनल सोसायटी फॉर क्लीन सिटीज, भोसले नगर मोहल्ला कमिटी आणि परिवर्तन यांनी अशाप्रकारचे कार्यक्रम आयोजित केले होते. यापैकी 3S भारत या संस्थेचा कार्यक्रम हा पुणे पातळीवरचा होता तर इतरांचे एखाद्या प्रभागापुरते मर्यादित होते. वाहतूक-कचरा-पाणी-रस्ते-पर्यावरण-अतिक्रमण-झोपडपट्टी या विषयावर बहुतेक ठिकाणी चर्चा झाली. भोसलेनगर (प्रभाग नं.१२) मधल्या आयोजित चर्चेत मात्र केवळ आणि केवळ स्थानिक प्रश्नांवरच चर्चा केली गेली. एकही प्रश्न पुण्याच्या पातळीवरचा उमेदवारांना विचारला गेला नाही, ना त्यावर चर्चा झाली. एकूणच समोरच्या नागरिकांनाही प्रभाग पातळीवरच्या प्रश्नातच रस असल्याचे जाणवले.

इतर ठिकाणच्या चर्चेतून उमेदवारांना पुण्यासामोरच्या प्रश्नांची नीट जाण होतीच असे नाही हे जाणवले. काही ठिकाणी उमेदवार एक बोलत होते, तर त्यांच्या पक्षांचे जाहीरनामे दुसरेच बोलत होते. पण असे एवढ्या मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम पुण्यात प्रथमच पाहायला मिळाले. त्यामुळे असे अधिकाधिक उपक्रम व्हायला

हवेत. या कार्यक्रमात जितके अधिक मतदार सामील होऊ लागतील तितकी त्यांची परिणामकारकता वाढत जाईल.

## मतदान जागृती

यावेळी असंख्य संस्था आणि संघटना मतदान जागृतीसाठी पुढे सरसावल्या होत्या. परिवर्तन, इंडिया अगेन्स्ट करप्शन, 3S भारत, स्वतः - स्वयं से परिवर्तन, सजग नागरिक मंच, दिपस्तंभ, नागरी चेतना मंच, समर्थ भारत व्यासपीठ अशा विविध संस्थांनी एकत्र येऊन मतदार जागृतीचे काम केले. तसेच डॉ. सतीश राजमाचीकर, विनोद बोधनकर, रणजीत जठार, सुधीर मांडके अशा काही स्वतंत्र व्यक्तीही या जागृतीच्या कामात उतरल्या होत्या. यापैकी अनेकांनी एकत्र येऊन मतदार जागृतीसाठी पुण्याच्या विविध भागातून पदयात्राही काढली होती.

परिवर्तन ने मतदार जागृतीची सुरुवात कॉलेजेस पासून केली. नंतर रस्त्यावर उतरून चौकाचौकात उभे राहात त्यांनी हे अभियान राबवले. परिवर्तन ने मतदार जागृतीसाठीसाठी flash mob सारख्या नवीन संकल्पनाही राबवल्या. परिवर्तन च्या सहाय्याने युवाव्रत नावाच्या संस्थेने विविध झोपडपट्ट्यांमधे मतदान जागृती आणि विशेषतः मतदान प्रक्रियेबाबत जागृती केली. प्रभाग पद्धतीमुळे अनेक नागरिक संभ्रमात होते. त्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्याचे काम परिवर्तन आणि युवाव्रत ने केले.

## प्रतिज्ञ पत्र

नैशनल सोसायटी फॉर क्लीन सिटीज या संस्थेने अनेक उमेदवारांकडून एक प्रतिज्ञ पत्र सही करून घेतले. ज्यामध्ये मोहल्ला कमिटीच्या बैठकांना उपस्थिती लावणे, प्रभागातील कचऱ्याचे व्यवस्थापन करणे अशा काही गोष्टींचा समावेश होता. मतदार जागृतीसाठी पदयात्रा आयोजित करणाऱ्या संस्थांनी मिळूनही एक प्रतिज्ञ सर्व उमेदवारांसाठी तयार केली होती. त्यावरही अनेक उमेदवारांनी सही केली. तसेच वंदना चव्हाण यांनी राष्ट्रवादीच्या सर्व उमेदवारांच्या तर्फे सही केली. या प्रतिज्ञापत्रामुळे निवडून येणाऱ्या नगरसेवकावर नैतिक जबाबदारी येईल या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला होता.

# निवडणूकीचा प्रचार

पुण्याच्या महानगरपालिका निवडणूकीमधे गेल्या निवडणूकीच्या प्रचाराच्या तुलनेत काही नवीन मुद्दे नक्कीच चर्चेत आले. त्याचबरोबर प्रचारमधे अधिक लोकांपर्यंत पोहचण्यासाठी संकेतस्थळे, सोशल नेटवर्कचा वापर आणि स्टार प्रचारकांचे रोड-शो असे प्रकार बघायला मिळाले.

### उमेदवार निवड

प्रत्यक्ष प्रचाराच्या काही काळ आधी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने उमेदवारीचे तिकीट हवे असेल तर त्या आधी एक चाचणी परिक्षा पास करण्याचे आव्हान इच्छुकांसमोर ठेवले. या परिक्षा पद्धतीमुळे बऱ्याच उलटसुलट चर्चा रंगु लागल्या आणि इतरांचा प्रचार सुरू होण्या आधीच मनसेने प्रचाराच्या पहिल्या फेरीत बाजी मारली. या परिक्षेमुळे या 'खळ्ळ-खट्यॅक' पक्षाकडे लोकांनी वेगळ्या नजरेने बघितले.

पुणे नागरिक संघटनेने सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार अशांची समिती बसवून इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या. अशा मुलाखतींच्या दोन ते तीन फेऱ्या झाल्या.

इतर पक्षांनी मात्र पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी इच्छुकांच्या मुलाखती घेणे वगैरे पारंपारिक पद्धतीने उमेदवारांची निवड केली.

### माहिती तंत्रज्ञानाचा वापर

या निवडणूकीमधे महाराष्ट्र निवडणूक आयोग, पुणे महानगरपालिकेचे निवडणूकीसाठीचे स्वतंत्र संकेतस्थळ यांनी निवडणूक प्रक्रीया अधिकाधिक पारदर्शी होण्यासाठी मदत केली.

निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर निवडणूकीची सर्व प्राथमिक माहिती उपलब्ध होती. आयोगाने काढलेली प्रत्येक अधिसूचना, नियमावली, निवडणूकीचा कार्यक्रम इत्यादी गोष्टी उपलब्ध करून दिल्या होत्या.

पुणे महानगरपालिलेच्या संकेतस्थळांवर बदललेली प्रभाग रचना, त्याचा तपशील, त्याच्या हद्दी. त्याच बरोबर त्या प्रभागाचा नकाशा इत्यादी गोष्टी दिल्या गेल्या होत्या. प्रभागांच्या नकाशासाठी गुगल नकाशाचाही आधार निवडणूक आयोगाने घेतला होता.

इथे नागरिकांना आपले नाव मतदार यादीमधे आहे का, हे तपासून पाहाण्याची संधी मिळाली. मुळात मतदार याद्यांमधे दोष असल्याने अनेक मतदारांना आपले नाव मिळाले नाही, परंतु अनेकांना आपले नाव जर दुसऱ्याच प्रभागात नोंदले गेले आसेल तर तेही कळायला मदत झाली.

अनेक राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी फेसबुकवर आपाला प्रचार नित्यनेमाने केला. त्यात त्यांच्या पक्षाच्या एखाद्या बड्या नेत्याचे फोटो टाकणे, त्यांच्या प्रचारसभेचे तपशील जाहीर करणे, त्याच बरोबर त्यांच्या वैयक्तिक प्रचारादरम्यानची छायाचित्रे इत्यादी माहिती टकली होती. राष्ट्रवादीच्या एका तरूण उमेदवाराने फेसबुक वरील जाहिरातींचाही वापर केला होता.

अनेक उत्साही मंडळींनी आपापल्या आवडत्या नेत्यांची छायाचित्रे आणि त्यावर प्रचाराचा मजकूर, काही विशेष घोषणा अशा गोष्टींनाही प्रसिद्धी दिली. त्यामधे दोन परस्पर विरोधी गटांच्या जाहीर सभांच्या गर्दीची तुलना इत्यादी गोष्टी केल्या होत्या.

अशा संकेतस्थळांबरोबर आपल्या पक्षनेत्यांच्या आवाजात आपल्या मतदारसंघात भ्रमणध्वनींवरूनही संपर्क साधला जात होता.

काही नेत्यांनी आपल्या प्रचारासाठी ट्विटरचा देखील वापर केला.

परंतु पक्षाच्या प्रचारामधे या माध्यमांचा वापर राजकीय पक्षांनी म्हणावा तसा करून न घेतल्याचे जाणवते. या माध्यमातून आपला जाहीरनामा, महत्वाच्या नेत्यांची भाषणे आपले प्रचाराचे मुद्दे यावर पध्दतशीरपणे प्रचार केला जाऊ शकत होता. पण राजकीय पक्षांचे जाहीरनामे सोडून इतर कोणतीही माहिती एखाद्या अधिकृत माध्यमातून नागरिकांना मिळत नव्हती.

### भाडोत्री प्रचारक

जवळजवळ सर्वच राजकीय पक्षांच्य उमेदवारांनी कोणत्या ना कोणत्या कामासाठी भाडोत्री प्रचारक घेतल्याचे आढळून आले. यामधे उमेदवाराच्या स्लीपा वाटणे, प्रचारसाहीत्य वाटणे आणि नेत्यांच्या जाहीर सभांमधे आणि रोड शो इत्यादींमधे उपस्थित राहणे या सर्व कामांसाठी अशी लोकं निश्चित करण्यात आली होती. प्रत्येक भागाप्रमाणे आणि उमेदवाराने त्यांना दिलेली रोजी वेगवेगळी आहे. काही महिला ज्या फक्त प्रचारसाहित्य वाटण्याचे २ ते ३ तासांचे काम करत त्यांना साधारण २५० रुपये रोज मिळत होते. फक्त त्यांच्या ज्यांच्या हातात ते साहित्य दिलं त्यांचं नाव व सही आणणं अनिवार्य होतं. काही पुर्णवेळ प्रचारक की जे अशी वाटण्याची कामे व त्याच बरोबर घोषणाही देत त्यांचा पगार अधिक जास्त होता. अशा लोकांचा गट आणि त्यांचा एक कंत्राटदार असे चित्र सर्वत्र दिसत होते. हा कंत्राटदार किंवा प्रचार सहाय्यक माणशी महीन्याला २ ते ३ हजार रुपये स्वत: कमवायचा असे हे महीना दोन महिन्याचे काम. यात त्याला वर्षाच्या पगारा एवढे उत्पन्न सहज सुटले असेल. आणि या अशा कामगारांना १० ते १५ हजार रुपये सहज सुटले असतील. या सर्व निवडणूकीच्या दरम्यान चालू होत असलेल्या अर्थव्यवस्थेचा विचार व अभ्यास होणे आवश्यक वाटते.

### दृश्राव्य माध्यमांचा वापर

ही महापालिका निवडणूक मराठी वाहीन्यांच्या प्रसारानंतरची पहिलीच पालिका निवडणूक म्हणावे लागेल. विधानसभा निवडणूकी पेक्षा या निवडणूका अधिक स्थानिक प्रश्नांवर लढवल्या जातात. मराठी वाहीन्यांनी आपल्या विविध कार्यक्रमांद्वारे स्थानिक नेत्यांना लोकांसमोर आणण्याची भूमिका बजावली.

सर्वच वाहिन्यांनी प्रमुख राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या मुलाखती ऐन निवडणूकीच्या तोंडावर पुन:पुन: प्रदर्शित केल्या. आयबीएन लोकमत मधील या मुलाखती जाहिरसभांमधील विषयही ठरवताना दिसल्या. त्याने स्थानिक प्रश्नांपेक्षा भावनिक मुद्दे मोठे केल्याचेही जाणवते.

वाहिन्यांच्या रणसंग्राम, रणसंग्राम रणरागिणींचा वगैरे जाहीर कार्यक्रमांद्वारे नागरिकांना थेट आपल्या विद्यमान नगरसेवकांना तसेच त्या भागातल्या उमेदवारांना थेट प्रश्न विचारता आले. या चर्चांचे विषय हे मूलत: रस्ते, पाणी, वीज व सार्वजनिक आरोग्य या भोवतीच खेळत होते. याच कार्यक्रमांमधे लोकांपुढे अभावानेच येणारे नगरसेवक सुद्धा समोर येऊन आपल्या बाजू मांडतांना दिसले. लोकांनी हे कार्यक्रम जरी करमणूक म्हणून पाहिले असले तरी याने मतदानावर कसा परिणाम झाले असेल याचा अभ्यास होणे आवश्यक आहे. या कार्यक्रमांमुळेच राजकीय नेत्यांना सुद्धा बोलण्याची, आपला मुद्दा मांडण्याची तयारी करावी लागली असेल. अशा जाहीर वादविवाद कार्यक्रमांमूळे राजकारणाबद्दलची जागृकता आणि निवडणूका या स्थानिक मुद्द्यांवर अधिक लढवल्या जातील अशी आशा वाटते.

अशा मुलाखती व जाहिर कार्यक्रमांबरोबरच या वाहीन्यांनी कोणत्या ना कोणत्या जनमत चाचणी करणाऱ्या कंपन्यांबरोबर जनमत चाचण्याही घेतल्या. त्यात नागरिकांना स्थानिक समस्यांबद्दल प्रश्न विचारण्यात आले होते. त्याच बरोबर राजकीय पक्ष आणि त्याच बरोबर नेत्यांची लोकप्रियताही या जनमत चाचण्यांद्वारे घेण्यात आली. लोकप्रियतेबद्दल जरी काही अंदाज बरोबर वाटले तरी एखाद्या पक्षाला साधारण किती जागा मिळतील हा अंदाज बहूतांश चाचण्यांच्या निश्कर्षांचा आणि राजकीय विश्लेषकांचाही चूकलेला दिसला.

### प्रमुख नेत्यांचा प्रचार

पुण्याच्या निवडणुकीमधे महाराष्ट्रातल्या सर्व दिग्गज नेत्यांनी भाग घेतलेला दिसला. आपला पायी प्रचार करायला वेळ कमी असल्याने रोड शो आणि प्रमुख ठिकाणी जाहीर सभा आणि माध्यमांवरील मुलाखती साधारण हेच त्यांच्या प्रचाराचे स्वरुप होते.

**कॉंग्रेस पक्ष-** खुद्द मुख्यमंत्री यांनी कॉंगेस भवनात मोठी सभा घेतली. राज्यात सत्तेत कॉंग्रेस आहे आणि त्यामुळेच शहर विकासासाठी लागणारा निधी आम्ही देऊ शकू असे अश्वासन ते देत होते. त्याच बरोबर गेली ६० वर्षे कॉंग्रेसचे देशभर वर्चस्व आहे म्हणूनच कॉंग्रेस पुण्याच्या विकासाला पुरक असा कार्यक्रम देऊ शकेल असे मांडले.

**राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष-** शरद पवार आणि अजित पवार यांच्या जाहिर सभा. त्यांनीही मनसे आणि कॉग्रेस प्रमाणेच पूर्ण सत्ता द्या असाच सूर लावला होता. त्याच बरोबर राज्यत आमचे सरकार आहे त्यामूळे आम्हाला मदत केल्यास राज्यसरकारही शहराला मदत करू शकेल असा मुद्दा त्यांनी मांडला.

**युती-** उद्धव ठाकरे यांची नदीपात्रातील सभा, सुधीर मुनगंटीवार यांच्या सभा झाल्या. सभेमधील प्रमुख मुद्दा म्हणजे गुजरातेत भारतीय जनता पक्षाने आणि मुंबईमधे शिवसेनेने जसा विकास केला आहे तसाच विकास आम्ही पुण्यात करू असा होता.

**महाराष्ट्र नवनिर्माण सेना**: राज ठाकरे यांची नदीपात्रातील सभा. प्रचाराचा सूर: पक्षाला महानगरपालिकांमधे पूर्ण सत्ता द्या त्यानेच पक्षाने शहरांसाठी पाहिलेले स्वप्न पूर्ण होईल असे मांडले. फक्त याच पक्षाने दादोजी कोणदेवांच्या पुतळ्याचा मुद्दा मांडला. नेहमीच्या शैलीच्या तुलनेत ही सभा थोडी कमी आक्रमक पण मुद्द्यांनी भरलेली अशी वाटली. पुणेकरांना डोळ्यासमोर ठेऊन हा बदल केला असावा.

# संदर्भ

**वृत्तपत्र**

- सकाळ
- महाराष्ट्र टाईम्स
- लोकसत्ता
- डीएनए
- टाईम्स ऑफ इंडीया
- इंडीयन एक्सप्रेस

**दृक्श्राव्य माध्यमे**

- स्टार माझा
- आय.बी.एन लोकमत

**संकेतस्थळे**

- www.punepolitics.com
- www.punepolls.com
- www.punevotes.com
- www.pmcelections.org
- www.punecorporation.org
- www.mahasec.gov.in

**व्यक्ति**

- निलम कुलकर्णी
- रुपाली पाटील
- अपूर्वा वानखेडे
- राम बोरकर

**पत्रकार**

- नितीन ब्रह्मे
- मयुरेश कोन्नुर
- प्राची कुलकर्णी

# Annexure

## आय.बी.एन लोकमत सर्वेक्षण- पुणे

आयबीएन लोकमतने आणि 'जीएफके-मोड' या मार्केट रिसर्च कंपनीने डिसेंबर २०११ ते जानेवारी २०१२ या २ महिन्याच्या कालावधीमधे महानगरपालिकांमधील मतदारांना नागरी समस्यांवर प्रश्न विचारले. एका कार्यक्रमात निखील वागळयांबरोबर उदय निरगुडकर होते व पुण्याचे राजकीय विश्लेषक म्हणून जेष्ठ पत्रकार अनंत दीक्षित होते.

या सर्वेक्षणामधे ५५% पुरुष आणि ४५% महिलांचा समावेश होता.
यात मराठी भाषिक होते ४५% हिंदी भाषिक: ३७% गुजराथी: ८% आणि इतर भाषिक: १०%

या सर्वेक्षणातील समोर आलेली उत्तरे अशी[1]:

### १. शहरातील सगळ्यात मोठी समस्या?

वाईट रस्ते: ७६% कचरा: ६८% वागतुक: ६८% घरांच्या वाढत्या किमती: ६५%
अवैध बांधकामे ५८%

### २. शहराच्या बकालीकरणाला जबाबदार कोण?

भ्रष्ट नगरसेवक: ५७%
नागरी कर्तव्यांचा अभाव: ४७%
लोकसहभागाचा अभाव: ४१%

### ३. बीआरटी अपयशी ठरल्याने ती रद्द करावी का?

होय: ६८% नाही: ३२%

### ४. आघाड्यांचं राजकारण शहराच्या विकासाला मारक ठरते आहे का?

होय: ७२%
नाही: २८% मेट्रो

[1] http://ibnlokmat.tv/showvideo.php?id=217832

५. आघाड्यांचं राजकारण भ्रष्टाचाराला मारक आहे का?

होय: ६८% नाही: ३२%

६. अजित पवार एक हाती सत्ता आल्यास पुण्याचा विकास झपाट्याने करू शकतील का?

होय: ६०% नाही: ४०%

७. फुरसुंगी कचरा डेपोची गरज आहे का?

होय: ४७% नाही: ५३%

८. झोपडपट्टी पुनर्वसनाची जबाबदारी बिल्डर्स ऐवजी महानगरपालिकेने घ्यावी का?

होय: ८३% नाही: १७% (स्लम अटलासचा उल्लेख)

९. नदी प्रदुषणाला नागरिकच जबाबदार आहेत का?

होय: ७८% नाही: २२%

१०. दादोजी कोंडदेवांचा पुतळा हलवायला नको होता का?

हो: १५% नको: ७५%

११. अण्णा हजारे फॅक्टर महत्वाचा ठरेल का?

होय: ५४% नाही: ४६%

१२. महापालिका निवडणूक शिवसेना-भाजपसाठी अस्तित्वाचा प्रश्न बनली आहे का?

होय- ८५% नाही- १५%

१३. गडकरी-मुंडे वादाचा फटका भाजपला बसेल का?

होय: ५९%

१४. महानगरातील नागरिकांच्या समस्या कोणता नेता अधिक न्याय देऊ शकेल?

राज ठाकरे- २५%, उद्धव ठाकरे- १३%, अजित पवार- ३५%, नितीन गडकरी- ०८%

## PMC ELECTIONS 16th FEB 2012: CITIZEN'S CHARTER of DEMANDS – CITY WIDE & WARD LEVEL from National Society for Clean Cities

**ELECTORAL WARD No: CANDIDATE's FULL NAME : PARTY :**

**Previous experience in social work :**

| CITIZEN'S EXPECTATIONS / DEMANDS | CANDIDATE'S RESPONSE Yes / No | WHERE ANSWER IS "YES" , a time-frame is required | REMARKS |
|---|---|---|---|
| 1. Personal information: Will You provide us with a copy of your candidature application: on the last date of filing your candidature, including affidavit/asset declaration; as well as caste certificate, if applicable? | | | |
| 2. Environment protection : Will You protect open spaces of your Electoral Ward and make it Clean & Green ? | | | |
| 3. BDP : Do you agree to support and implement within the next 3 years the Bio- Diversity Parks in the 23 fringe villages and not allow any construction in this area as per our demand ? | | | |
| 4. Anti-encroachment: Will You support Our demand, and act to remove encroachments on roads and public amenity spaces? Please specify the present encroachments which you will get removed - before and within 3 months after elections. | | | |
| 5. Solid Waste Management: Will You support a) implementation of Supreme Court guidelines of year 2000 which mandates garbage segregation at source, b) Plastic Waste ( Handling and Management ) Rules 2011 c) Efficient waste processing plant. | | | |
| 6. Sewage Treatment: Do you agree to our demand that 100% of Pune's sewage will be treated by setting up sufficient capacity of Sewage Treatment Plants in the next 3 years, And no untreated water will be discharged into Pune's rivers from 1st April 2015? | | | |
| 7. Public Amenities: Will You undertake to have them acquired as per D.P and developed as gardens, playgrounds, hawkers zones? Please specify which reserved plots you will focus on in your Electoral Ward. | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 8. Hawkers Zones: Are You prepared to implement the "NO Hawker Roads" in your Electoral Ward? Please specify at which alternate locations you will have Hawkers zones set up, and when. | | | |
| 9. Water Supply: Do you agree to ensure that PMC will supply water equitably to all areas of Pune and particularly to the outlying areas by 1st April 2015? | | | |
| 10. Citizen Representation: Will You ensure that our Mohalla Committee representative is made a member of the Prabhag Samiti? | | | |
| 11. Ward Office Meeting: Will You attend all Monthly Ward Office Meetings with Mohalla Committees and ensure that these meetings take place every month, and decisions taken there are executed as per commitment? | | | |
| 12. Citizen Participatory Budget & Comprehensive Mobility Plan: Will You ensure Citizen's participation and implementation of their viable proposals? | | | |
| 13. Will You ensure that issues which are to come up before the General Body, Standing Committee, City Improvement Committee, etc. are put up 48 hrs before the meeting, on PMC website as well as on a special Notice Board in all the 14 Ward Offices? AND, Will You discuss these issues with citizens at the Ward Office meetings? Similarly, for all PMC work orders of over Rs. 1.00 crore, all specifications, contract details etc. will be put up on the PMC website and on PMC notice boards and discussed with citizens at the Ward Office meetings. | | | |
| 14. Will You support the Development Plan 2012 as and when it is cleared by the State Government? AND, Will You ensure that during your tenure of 5 years at least 20% of the DP is implemented? | | | |
| 15. Will You be responsible for PMC's Maintenance of Roads and Footpaths, and also for Road Safety & Traffic regulations in your Electoral ward? | | | |
| 16. Please advise yours views on :<br>BRTS<br>underground or over-ground Metro<br>Bio gas plants<br>Rain water harvesting | | | |
| SIGNATURE:<br><br>DATE: | | | |